अग्रलेखांचा नवाकाळ बादशहा

संस्थापक : नाट्याचार्य कृष्णाजी प्रभाकर खाडिलकर

नवा काळ

।। न मे भक्त: प्रणश्यति ।।

अग्रलेखांचा नवाकाळ बादशहा

# विकासाचा पाया असलेल्या सामान्यांकडे दुर्लक्ष

अलिकडेच मुंबईच्या सहार इथल्या नव्या देखण्या आंतरराष्ट्रीय विमानतळाचे पंतप्रधान मनमोहन सिंग यांच्या हस्ते औपचारिक उद्घाटन झाले. हे विमानतळ किती अब्ज खर्चून बांधले गेले ते हळूहळू बाहेर येईल. परंतु, आजच्या ताज्या माहितीप्रमाणे किमान दहा हजार कोटी रुपये खर्चून या पंचतारांकित विमानतळाला सजवले गेले आहे. मुंबई ही आंतरराष्ट्रीयदृष्ट्या महत्त्वाची नगरी आहे. इथे जगभरातून दरवर्षी लाखो पर्यटक येतात. आता तर बहुराष्ट्रीय कंपन्यांना आपल्या सरकारने मुक्तद्वार दिले आहे. जगभरातल्या अनेक नामवंत कंपन्यांना भारतात आपापले उद्योग सुरू केले आहेत. अगदी महाराष्ट्रातसुध्दा अमेरिकन, जपानी, फ्रान्स या कंपन्यांनी पुण्याजवळ कारखाने उभारले आहेत. अशा बदलत्या परिस्थितीत आंतरराष्ट्रीय उद्योग समूहाच्या लोकांना तेवढ्याच आंतरराष्ट्रीय दर्जाच्या पायाभूत सुविधांची गरज आहे यात काही शंका नाही. विकास किंवा प्रगती करायची असेल तर अशा प्रकारच्या सुधारणा केल्याच पाहिजेत यातही दुमत नाही. या नव्या आंतरराष्ट्रीय विमानतळावर जागतिक दर्जाच्या सर्व प्रकारच्या सुविधा दिल्या गेल्या आहेत. सर्वांत महत्त्वाचे म्हणजे याच विमानतळावर आपल्या देशातल्या विविध प्रांतांचे सांस्कृतिक, ऐतिहासिक आणि भौगोलिक महत्त्व सांगणाऱ्या अतिशय देखण्या प्रदर्शनाचीही उभारणी केली गेली आहे. जगाच्या कानाकोपऱ्यातून येणाऱ्यांना भारताची ओळख करून देणारे हे प्रदर्शनसुध्दा तितकेच महत्त्वाचे आहे. यासाठी किमान पाच हजार कोटींचा खर्च झाला असावा असा आमचा प्राथमिक अंदाज आहे. त्याशिवाय इतक्या आकर्षक पध्दतीने त्यांची उभारणीच होऊ शकत नाही. अशा पध्दतीने आधुनिक आणि जगाच्या विमानतळांशी स्पर्धा करू शकणारे बांधकाम करायला कोणाची ना नाहीच. परंतु, हा सगळा आंतरराष्ट्रीय दर्जाचा देखावा उभा करताना आपण कोणती किंमत मोजत आहोत, कोणाच्या जीवावर हा खर्च केला जातोय, याचाही विचार व्हायला पाहजे. केवळ श्रीमंतांच्या परदेशस्थ लोकांच्या सोयीसुविधांसाठी एवढी मोठी किंमत मोजत असताना या पायाभूत सुविधांचा जो खरा पाया आहे त्या सामान्य माणसांच्या सोयीसुविधेकडे तेवढेच लक्ष द्यावे लागेल. अन्यथा 'मोठ्या घरचा पोकळ वासा' किंवा 'नाव सोनुबाई आणि हाती कथलाचा वाळा' असे म्हणण्याची वेळ येते. आज जवळपास तीच परिस्थिती आहे. जगाशी स्पर्धा करताना आपल्या देशातील दुनियेला सुंदर बनविण्याचा ध्यास घ्यावा लागेल. कोट्यवधी रुपये खर्चून अक्षरश: आलिशान विमानतळ बनविताना भारतासारख्या विकसनशील म्हणजे विकास करून दाखविणाऱ्या देशातल्या तळागाळातल्या सामान्य माणसाला जीवन जगण्याच्या गरजा पुरविल्या गेल्या पाहिजेत.

## नियोजनाचा अंधार

असे होण्यामागचे कारण म्हणजे आपल्या देशाचे राज्यकर्ते नियोजन करताना सामान्य माणसाचा विचारच करीत नाहीत. केला तरी त्याचा त्या प्राधान्य गोष्टींच्या क्रमवारीत शेवटचा नंबर असतो. मुंबई देशाची औद्योगिक राजधानी आणि आर्थिकदृष्ट्या आंतरराष्ट्रीय महत्त्व असलेले शहर आहे. पण इथला सामान्य माणूस दुर्लक्षित राहातो. त्याचे ताजे उदाहरण म्हणजेच हे आंतरराष्ट्रीय दर्जाचे नवे विमानतळ आहे. दरवर्षी केवळ पाच लाख लोक ज्या विमानतळाचा वापर करतात. त्यांच्यासाठी झट्दिशी वीस हजार कोटी मंजूर होतील. मात्र, त्याच आंतरराष्ट्रीय महत्त्वाच्या महानगरात रोज ६० लाख लोक ज्या उपनगरीय रेल्वेचा वापर करतात त्यासाठी दहा हजार कोटीसुध्दा खर्च होत नाहीत. आंतरराष्ट्रीय विमानतळ एवढे चकचकीत केले गेले आहे की, या परदेशी पाहुण्यांच्या पायाला छोटीशीसुध्दा इजा होणार नाही अशी दक्षता घेतली गेली आहे. अगदी त्या ठिकाणी आंतरराष्ट्रीय स्वरुपाच्या गुळगुळीत टाईल्स बसविल्या गेल्या आहेत. तरी कोणीही पाय घसरून पडणार नाही याची काळजी घेतली गेली आहे आणि त्याच मुंबईतल्या उपनगरी रेल्वे स्थानकांचे फलाट दुरूस्त करायला सरकारला वेळ नाही आणि पैसा नाही. इथे रोज अनेक लोक पाय घसरून पडतात. त्यातले अनेक मृत्यूमुखी जातात. तर अनेकांना आपले हातपाय गमवावे लागतात. घाटकोपर रेल्वे स्थानकात घडलेल्या प्रकारात एका तरुणीला आपले दोन्ही हात गमवावे लागले आहेत. म्हणजे नगरी एकच परंतु तऱ्हा अनेक, शहर एकच पण सोयीसुविधांमध्ये पंक्तीप्रपंच, अशी भयानक विषमता पहायला मिळते.

## मुंबईवर अन्याय

जो सामान्य माणूस ज्या राष्ट्राचा खरा पाया आहे, खरा आधार आहे त्याच्याकडे दुर्लक्ष करणारे अनेक प्रकार या देशात रोज घडतात. आम्ही किती चांगल्या दर्जाचे विमानतळ बांधू शकतो हे दाखवल्यामुळे आपण पुढारलेले आहोत असे सिध्द होत नाही. आपल्याकडे इंग्लंड, अमेरिकेप्रमाणे मेट्रो आली, मोनोरेल किंवा त्यांच्याप्रमाणे आपणही चंद्रावर, मंगळावर यान पाठवले म्हणजे आपली परिस्थिती सुधारली आहे असेही होत नाही. हे सगळे उपक्रम राबवताना सामान्य माणसालाही त्याचा लाभ मिळाला पाहिजे. दुर्दैवाने आज देशातला ६० टक्के सामान्य माणूस विकासाच्या प्रक्रियेपासून वंचित राहतो. त्याला आवश्यक गोष्टींपेक्षा इतर सुविधाच त्याच्या डोक्यावर आदळल्या जातात. ज्याप्रमाणे गावात, खेड्यात रोजगाराची, चांगल्या शिक्षण आणि आरोग्य सुविधांची गरज असताना टिव्ही, मोबाईल, मॉलसारख्या गोष्टी सहजपणे पोहोचवल्या जातात. मुंबईची तशीच परिस्थिती आहे. ज्या महानगरातले ५० लाख लोक झोपडीत राहतात त्या महानगरातल्या गरीबाला जीवन जगण्याच्या किमान सुविधा नाकारल्या जातात. विकास करताना होणारा हा फरक दुर्दैवी ठरतो. आज तर अशी परिस्थिती आहे. परदेशातून भारतात पर्यटनासाठी येणारे पर्यटक भारतातली गरिबी पहाण्यासाठी येतात. अगदी मुंबईतल्या धारावीत जाऊन तो परिसर पहाणारे अनेक परदेशी लोक आहेत. आता हे सांगूनही कोणाला पटणार नाही. म्हणजे आंतरराष्ट्रीय दर्जाच्या चकाचक विमानतळावर उतरायचे आणि दुसरीकडे मुंबईतल्या झोपडपट्ट्या, गरिबी पाहून इथल्या माणसाचा जीवन जगण्याचा दर्जा किती खालचा आहे हे पाहून त्यांनीच आश्चर्यचकित व्हायचे. अशीही विसंगत आणि विरोधाभास सांगणारी परिस्थिती आहे. तेव्हा विकासाचा क्रम ठरविताना त्याचा केंद्रबिंदू सामान्य माणूस राहिला पाहिजे. विकासाची झेप कितीही आंतरराष्ट्रीय दर्जाची असली तरी राष्ट्रीय गरजांचे नेमके भान राहिले पाहिजे. ज्याप्रमाणे एका कवीने म्हटले होते त्याचा अनुभव सतत येत राहातो,

उपासपोटी गरीब मरती
विकास भोज बंगल्यावरती
स्वातंत्र्याची हीच महती
म्हण रत्नांची खाण आमची